| | |
|---|---|
| PUBLICATION | Kesari |
| DATE | January 09th, 2019 |
| PAGE NO | 08 |
| Edition | Pune |

# नवराष्ट्र महाविद्यालयात 'पोलिसांशी थेट भेट' कार्यक्रम

पिंपरी : क्विक हील फाऊंडेशन आणि पंख संस्थेच्या संयुक्त विद्यमाने 'जीवनमूल्य प्रशिक्षण' प्रकल्पा अंतर्गत पिंपरी येथील नवराष्ट्र महाविद्यालयातील ११ वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'पोलिसांशी थेट भेट' अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचा विषय 'बाल लैंगिक अत्याचार व पॉक्सो कायदा' असा होता.

या कार्यक्रमाचा उद्देश मुला-मुलींना लैंगिक अत्याचार व पॉस्को कायद्याविषयी जनजागृती करणे हा होता.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पिंपरी पोलीस ठाण्याचे फौजदार ज्ञानोबा निकम, सुप्रिया पारसे व संदीप ओझरकर उपस्थित होते. नवराष्ट्र महाविद्यालयाचे प्राचार्य उत्तम पाटील, पंख संस्थेच्या अध्यक्षा स्मिता आपटे तसेच पंखचे समुपदेशक उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी पोलिसांशी संवाद साधला व वेगवेगळे प्रश्न विचारले. पोलिसांनी त्यांच्या शंकांचे निरसन केले.